नि.फौ.ख.क्र.११३/२०२४

सरकार -वि- सौरभ **नि.क्र.२६**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — मुस्कान जितेंद्र अग्रोया

वय. २३ वर्षे, व्यवसाय — खाजगी नोकरी,

निवासस्थान – ह.मु. नागपुर ता. व जिल्हा – नागपुर.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत –</u>**

मी फिर्यादीला ओळखते. ती माझी गेल्या दहा वर्षापासुनची मैत्रीण आहे. मी आरोपीला ओळखते. त्याचेविषयी मला फिर्यादीनेच सांगितले होते. घटना दोन ते अडीच वर्षापुर्वीची आहे. मी सन २०२४ मध्ये फिर्यादीसोबत नागपुर येथे तिच्या फ्लॅटमध्ये राहत होती. फिर्यादी त्यावेळी नागपुर येथे आर्किटेक्चरचे शिक्षण घेत होती. मी जॉब पाहण्यासाठी नागपुर येथे गेली होती. आम्ही दोघेही एकत्रातच राहत होतो. तिचेसोबत राहत असतांना माझ्या असे निदर्षनास आले की तिला नियमीतपणे सतत कोणाचातरी फोन येत आहे. सदरचा फोन आल्यानंतर ती चिंताग्रस्त होत होती त्यामुळे मी तिला विचारले. मी तिला विचारले की, तु फोन आल्यावर डिस्टर्ब का होते. त्यावर तिने मला सांगितले की, सौरभ रहांगडाले, राहणार तुमसर नावाचा मुलगा हा मला वारंवार फोन करून परेशान करून धमकी देत आहे. तिने मला सांगितले की, तो तिला धमकी देतो की, तो तिच्या ऑफिस व कॉलेजमध्ये येवुन तमाशे करेल. तिने मला सांगितले की, तो तिला धमकी देतो की, तुझे मम्मी पप्पा तुमसर मध्येच आहे तु सांभाळुन रहा, मी जसे सांगतो तसेच कर. तिने मला सांगितले की, त्याने तिला तुझ्या मम्मी पप्पाला जिवाने मारून टाकीन अशी धमकी दिली. तो तिला म्हणायचा की तु मला ओळखत नाही की, मी काय करू शकतो.

२. त्यावर मी तिला तु एवढी परेशान होत असेल तर तु पोलिसात तक्रार दाखल कर असे म्हटले. त्यानंतर एका दिवशी फिर्यादीने आरोपीचा फोन उचललाच नाही. त्यानंतर त्याने फिर्यादीच्या आईला फोन केले तसेच मॅसेज सुध्दा केले. त्यामध्ये त्याने तिच्या चारित्र्याबाबत संशयास्पद लिहीले होते. तो फिर्यादीस म्हणत असायचा की, तो तिचे लग्न होवु

देणार नाही. त्यानंतर फिर्यादीने तिच्या आईला सोबत घेतले व पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी सदर घटनेबाबत माझ्याकडे विचारपुस केली होती. त्याप्रमाणे मी जबाब दिला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. गहाणे यांच्या मार्फत</u> –**

३. माझे बी.फॉर्म चे शिक्षण झाले आहे. सदरची पदवी ही चार वर्षांची असते. माझे प्राथमिक शिक्षण यु.एस.ए. विज्ञालय तुमसर येथे झाले आहे. बारावीचे शिक्षण नागपुर येथे झाले आहे. बी.फॉर्म चे शिक्षण गोंदिया येथे झाले आहे.

४. फिर्यादीचे दहावी पर्यंतचे शिक्षण सनफ्लॅग कंपनीच्या शाळेत वरठी येथे झालेले आहे. तिचे बारावी पर्यंत शिक्षण तुमसर येथे झालेले आहे. पोलिसांनी माझे बयाण सन २०२४ मध्ये नोंदविले होते. मी पोलिसांना बयाण देतेवेळी सन २०२४ मध्ये बी.फॉर्मच्या तिस–या वर्षाला गोंदिया येथे शिक्षण घेत आहे असे सांगितले आहे ते खरे व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, लहानपनापासुन फिर्यादी व मी कधीच शाळेमध्ये शिक्षण सोबत घेतलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, ट्युशन क्लासमध्ये सोबत होती. आर्किटेक्चर ची पदवी ही चार वर्षाची असते किंवा काय ते मला माहीत नाही. सन २०२४ मध्ये फिर्यादी ही आर्किटेक्चरच्या तिस–या वर्षाला होती किंवा काय ते मला माहीत नाही. ती सन २०२४ मध्ये देव असोसिएट्स यांच्याकडे एंटरशिप करत होती. हे म्हणणे खरे आहे की, एंटरशिप हे पदवीच्या शेवटच्या वर्षी केली जात असते. मी पोलिसांना जबाब देतेवेळी नागपुर येथे जॉब पाहण्यासाठी गेली असल्याचे सांगितले नव्हते. पोलिसांना जबाब देतेवेळी फिर्यादीस नियमितपणे एक फोन येत होता व फोन आल्यानंतर ती चिंताग्रस्त होत होती हे मी सांगितले होते. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला त्यामध्ये सदरची बाब नमुद नाही. मी सांगितल्यानंतर पोलिसांनी ते का नमुद केले नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२४ मध्ये मी पोलिस उपविभागीय अधिकारी श्रीमती राव यांना ओळखत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांच्या सांगण्यानुसार प्रस्तुत

प्रकरणात पोलिसांसमक्ष बयाण दिलले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या या प्रकरणाशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे फिर्यादीसोबत कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. ०२.०६.२०२६ | दि.०२.०६.२०२६ |